## :: नियुक्त्या ::
## जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांच्या आस्थापनेवर खाली नमुद केलेल्या पदाकरीता उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास पात्रता धारण करणा—या उमेदवारांकडून ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

विस्तृत/सविस्तर जाहिरात विहीत अर्जाच्या नमुन्यासह, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांचे अधिकृत संकेतस्थळ https://beed.dcourts.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/७/२०२६ च्या सकाळी ११.०० वाजता पासून उपलब्ध राहील. सदर अर्जाचा नमुना वरील संकेत स्थळावरून डाउनलोड करता येईल.

| पदाचे नाव | एकूण रिक्त पदे | पुढील २ वर्षात रिक्त होणारी पदे | दिव्यांगासाठी आरक्षित पदे (४%) | निवड यादी | प्रतिक्षा यादी | नियमाप्रमाणे सफाईगार या पदासाठी वेतन श्रेणीमधील वेतन स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| सफाईगार | २ | ३ | निरंक | ५ | ३ | एस—१ : १५०००—४७६०० |

निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरातीच्या **खंड ''क''** मध्ये नमुद केलेल्या आवश्यक **पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट** **(Postal Order/ Demand Draft)** इत्यादीसह **परिशिष्ट—अ** मधील नमुन्यानुसार, दिनांक १०/०८/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत किंवा त्या आधी पोहचेल या बेताने खालील पत्त्यावर फक्त **शीघ्र टपालाव्दारे (Speed Post)** पाठवावेत.

स्वाक्षरीत
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
बीड — ४३११२२.

## जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

### ''सफाईगार '' पदाकरीता भरती प्रक्रिया—२०२६.

अर्ज साध्या पोस्ट व्दारे/कुरीयर व्दारे/किंवा समक्ष/हस्ते (By hand) स्वीकारले जाणार नाहीत. दिनांक १०/०८/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजलेनंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उपरोक्त अर्ज समाविष्ट असलेल्या लिफाफ्यावर **'' सफाईगार पदासाठी अर्ज ''** असे स्पष्टपणे लिहीणे आवश्यक आहे.

निवड प्रक्रिये दरम्यान घेतल्या जाणा—या प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी आणि मुलाखतीसाठी उमेद्वारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (shortlisting) सर्व अधिकार निवड समिती, **जिल्हा व सत्र न्यायालय, बीड** यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

**सफाईगार हे एकाकी पद (Isolated Post) असून, सदर पदास भविष्यात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत याची उमेद्वाराने नोंद घ्यावी.**

## अ) पात्रता

१. उमेद्वार भारताचा नागरिक असावा.

२. शैक्षणिक अर्हता :

* उमेदवार किमान सातवी इयत्ता उत्तीर्ण असावा.
* उमेदवाराची शरीरयष्टी सुदृढ असावी, जेणेकरून त्यापदावरील कर्तव्य तो पार पाडु शकेल.
* उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

३. अनुभव :

* उमेदवाराला शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा अनुभव असल्यास प्राधान्य दिल्या जाईल, न्यायालयात काम करण्याचा असा अनुभव असल्यास, विशेष प्राधान्य दिले जाईल.

४. वयोमर्यादा :

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| खुला | १८ वर्षे | ३८ वर्षे |
| मागासवर्ग (अ.जा/अ.ज., इ.मा.व., वि.जा/भ.ज., वि.मा.प्र. ईत्यादी) | १८ वर्षे | ४३ वर्षे |
| योग्य मार्गाने अर्ज करणा–या राज्य/केंद्र सरकारी कर्मचा–यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. (कंत्राटी कामगार वगळता) | १८ वर्षे | लागू नाही |

## ब) पात्र उमेदवारांसाठी अटी

| | |
|---|---|
| १) | उमेदवाराचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी. |
| २) | उमेदवार काम करण्यास सक्षम असावा. |
| ३) | उमेदवारास कोणतेही न्यायालय/एम.पी.एस.सी/यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकलेले किंवा अपात्र ठरविलेले नसावे. |
| ४) | उमेदवारास नैतिक अध:पतनाच्या अथवा इतर कोणत्याही गुन्हयासाठी फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नसावे किंवा उमेद्वारा विरूध्द फौजदारी खटला प्रलंबीत नसावा. |
| ५) | उमेदवारास हयात असलेल्या पत्नी/ पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी. |
| ६) | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी. |

## क) अर्ज भरण्याचे शुल्क

| | |
|---|---|
| १) | सदर भरती प्रक्रियेसाठी अर्ज शुल्क रूपये ५००/– (रूपये पाचशे मात्र) (सर्व प्रवर्गासाठी) एवढे असेल. |

| | |
|---|---|
| २) | अर्ज शुल्क हे "DISTRICT AND SESSIONS COURT, BEED" यांच्या नावेच काढलेली रूपये ५००/— (रूपये पाचशे मात्र) ची पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) स्वरूपात अर्जासोबत सादर करावे.<br>सदर शुल्क पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) शिवाय इतर स्वरूपात म्हणजे Cheque/धनादेश किंवा रोख रक्कम अर्जासोबत पाठविण्यात आली तर तसे अर्ज रद्दबातल करण्यात येतील याची नोंद घ्यावी. |
| ३) | अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. |
| ४) | अर्ज शुल्क ना—परतावा (non-refundable) असेल |

## ड) निवड प्रकिया

आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प सुची (short list) प्रमाणे पात्र उमेद्वारांना पुढील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| **अ.क्र.** | **मुल्यांकन पध्दती** | **एकुण गुण** | **किमान पात्रता गुण** |
|---|---|---|---|
| १) | प्रात्यक्षिक परीक्षा | ३० | १५ |
| २) | शारीरीक क्षमता चाचणी | १० | ५ |
| ३) | वैयक्तीक मुलाखत (Interview) | १० | ५ |
| ४) | **निवड प्रक्रियेचे एकुण गुण** | **५०** | **२५** |

## सूचनाः

| | |
|---|---|
| १) | प्रात्यक्षिक चाचणीत उत्तीर्ण झालेले उमेदवारच शारीरीक क्षमता चाचणीसाठी पात्र ठरतील. |
| २) | शारीरीक क्षमता चाचणीत उत्तीर्ण झालेले उमेदवारच वैयक्तीक मुलाखतीसाठी पात्र ठरतील. |
| ३) | वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक व निकाल जिल्हा व सत्र न्यायालय, बीड च्या अधिकृत संकेतस्थळावर (https://beed.dcourts.gov.in) व सुचना फलकावर (Notice Board) वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर उमेदवारांनी नियमितपणे अधिकृत संकेतस्थळाला भेट देत रहावे. |

| | |
|---|---|
| इ) | उमेदवाराने अर्जासोबत पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) वगळता इतर कोणतेही कागदपत्रे जोडू नयेत. |

| | |
|---|---|
| ई) | जे उमेदवार वैयक्तीक मुलाखतीसाठी पात्र ठरतील त्यांनी वैयक्तीक मुलाखतीसाठी येताना खालील कागदपत्रांच्या स्वत: प्रमाणित (Self attested) केलेल्या छायांकित प्रती सादर कराव्यात. तसेच सोबत मुळ प्रती तपासणीसाठी आणाव्यात. |

| | |
|---|---|
| १) | जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/सक्षम प्राधिकरणाने निर्गमीत केलेले जन्म प्रमाणपत्र/एस.एस.सी. बोर्ड प्रमाणपत्र ( School Leaving Certificate/ Birth Certificate issued by Competent Authority / Board Certificate of SSC) |
| २) | शैक्षणिक पात्रता परीक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (७वी, १०वी, १२वी किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाकडून घेतलेली पदवी, इत्यादी) |
| ३) | शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पूर्वानुभव असल्यास त्या संबंधीचा दाखला. |
| ४) | जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेले **दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी** दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा पत्ता व फोन नंबर सह) **(परिशिष्ट ब)** |
| ५) | लहान कुटुंबाबाबत स्वयं घोषणापत्र (Self Declaration) **(परिशिष्ट क)** |
| ६) | सक्षम अधिकारी यांनी प्रदान केलेला जातीचा दाखला. (केवळ मागासवर्गीयांसाठी) |
| ७) | महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र. (Domicile Certificate) |
| ८) | सेवायोजन कार्यालय नोंदणी केलेली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ९) | उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना—हरकत प्रमाणपत्र. |
| १०) | विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर लग्नानंतर नांव बदलेले असेल तर नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज, उदाहरणार्थ शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत, इत्यादी. |
| ११) | संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह. |
| १२) | आधार कार्ड. |
| १३) | न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे. |

## फ) उमेदवारांकरीता अतिरीक्त सूचना

| | |
|---|---|
| १) | अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावा **(जाहिरातीसोबत दिलेली परिशिष्ट 'अ' नमुन्यात)** |
| २) | अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे. |

| | |
|---|---|
| ३) | उमेदवाराने अर्ज भरताना संपूर्ण नांव, पत्ता, मोबाईल नंबर, ई—मेल आयडी (E-mail) जन्म तारीख त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या वैध कागदपत्रानुसार अचूक रित्या नमूद करावे. |
| ४) | सफाईगार पदासाठी इयत्ता ७वी मधील गुण नमूद करणे अनिवार्य असेल. जर उमेदवार इयत्ता ७वी ची परीक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १०वी किंवा १२वी असेल व उमेदवाराकडे इयत्ता ७वीचे गुणपत्रक नसेल तर उमेदवाराने अर्ज भरताना इयत्ता ७वी करिता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी. |
| ५) | उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्ज सादर करण्याच्या दिवशी धारण करीत असलेली अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने पात्रता खालील दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी. |
| | १. ७वी |
| | २. एस.एस.सी.(S.S.C.) |
| | ३. एच.एस.सी. (H.S.C.) किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेली पदवी. |
| | ४. अर्ज दाखल करतेवेळी उमेदवार धारण करीत असलेली उच्चतम आणि संपूर्ण शैक्षणिक पात्रता नमूद करणे बंधनकारक आहे. |
| ६) | उमेदवाराविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पूर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती दयावी. तसेच उमेदवार सध्या नोकरीत असल्यास, निलंबीत असल्यास किंवा त्याच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबीत असल्यास, तसे अर्जात नमूद करावे. |
| ७) | उमेदवाराने पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट नंबर आणि त्याचा दिनांक अर्जात नमूद करावा. सदरहू मुळ (Original) पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडावे. |
| ८) | उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास शुल्कासह उमेदवाराचा शेवटचा अर्ज विचारात घेतला जाईल. |
| ९) | उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता आणि निकष पूर्ण केले असतील तरच अर्ज स्वीकारला जाईल. |
| १०) | सदरहू पदे जशी—जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. |

| | |
|---|---|
| ११) | उमेदवाराने अर्जाचा नमुना जिल्हा व सत्र न्यायालय, बीडच्या संकेत स्थळावरून (https://beed.dcourts.gov.in) डाउनलोड करून घेवून केवळ ए–४ आकाराच्या चांगल्या दर्जाच्या कागदावर सुस्पष्टपणे टंकलिखीत अगर संगणकीकृत टायपींग करून **दिनांक १० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** किंवा त्याआधी नमुद केल्याप्रमाणे स्पीड पोस्टाने पोहचेल असे पाठवावे. **लिफाफ्यावर ''सफाईगार पदासाठी अर्ज'' असा स्पष्ट उल्लेख करावा व सदर लिफाफा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड, नगर रोड बीड या पत्त्यावर स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्यात यावा.** |
| १२) | उमेदवाराने अर्जा मधील फोटोच्या रकान्यामध्ये स्वत:चे नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिटकवावे. स्वाक्षरीची सुरूवात सदर छायाचित्रावर करून काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशाप्रकारे बॉलपेनने स्वाक्षरी करावी. |
| १३) | उमेदवार जर शासकीय सेवेत असेल तर त्यांचा उमेदवारीचा विचार होण्यास विभागास कोणतीही हरकत नाही असे विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख यांचेकडून ''नाहरकत प्रमाणपत्र'' घ्यावे. त्यांनतर मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, मुलाखतीच्या वेळेस हे मुळ प्रमाणपत्र सादर करावे. **परंतु उमेदवाराने आपला अर्ज विभागप्रमुख किंवा कार्यालय प्रमुख यांचे मार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.** |
| १४) | अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशिलामुळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल असा अर्ज बाद ठरविला जाईल आणि त्याबाबत कोणतीही तक्रार किंवा उजर ऐकला जाणार नाही. |

## **(ग)** उमेदवारांकरिता इतर आवश्यक सूचना **:-**

| | |
|---|---|
| १) | जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्ता तसेच शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा व कार्यालय परिसर स्वच्छतेचा पुरेसा अनुभवानुसार अल्पसूची करण्याचे सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. |
| २) | भरती प्रक्रिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदार यांना कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगीत करणे अथवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी स्वत:कडेच राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. |

| | |
|---|---|
| ३) | निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदार अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास उमेदवारास पदावरून कोणतीही पूर्व सुचना न देता काढून टाकण्यात येईल. |
| ४) | अल्पसुचित समाविष्ट उमेदवार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला प्रात्यक्षिक परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. |
| ५) | केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हाच सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही. |
| ६) | जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांचे नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते. असा बदल वेळोवेळी जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांच्या अधिकृत संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिध्द केला जाईल. त्याकरिता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर (https://beed.dcourts.gov.in) वेळोवेळी भेट दयावी. |
| ७) | उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरीक क्षमता चाचणी व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार /दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही. |
| ८) | उमेदवाराने सफाई कामाची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच शारीरीक क्षमता चाचणी मध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने मुलाखतीच्या वेळेस सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. |
| ९) | पात्र उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षा, शारिरिक क्षमता चाचणी तसेच वैयक्तीक मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्व:खर्चाने हजर रहावे लागेल. |
| १०) | प्रात्यक्षिक परीक्षा, शारिरिक क्षमता चाचणी तसेच वैयक्तीक मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा—या उमेदवारांनी स्वत:चे मूळ ओळखपत्र (Identity Card) उदा. :— मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा सोबत आणावा. |
| ११) | उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे काम करणा—या अधिका—यांना, कर्मचा—यांना भेटण्याचा किंवा त्यांच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीश: अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व त्यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. |

| | |
|---|---|
| १२) | निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमुद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होउ शकला नाही तर उमेदवाराचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल. |
| १३) | निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल, परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील. |
| १४) | उमेदवारांची निवड ही प्रात्यक्षिक परीक्षा, शारिरिक क्षमता चाचणी व वैयक्तीक मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल. |
| १५) | निवड सुची/प्रतिक्षा सुची ही मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेस अधीन राहून, दोन वर्षाच्या कालावधीकरीता अथवा मा. उच्च न्यायालय विहीत करेल अशा कालावधीसाठी वैध राहील. |
| १६) | निवड झालेल्या उमेदवारांची सेवा ही मा. उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाव्दारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमाप्रमाणे असेल. |
| १७) | उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार अंशदान निवृत्ती वेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागू राहतील. |
| १८) | उमेदवारांची सेवा त्यांच्याबाबत संबंधीत पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करून घेतल्या जाणा—या चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्रास अधिन राहुन असेल. |
| १९) | प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान गुण मिळविलेल्या उमेदवारांची संख्या १२० पेक्षा अधिक झाल्यास गुणवत्तेच्या आधारे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाच्या १५ पट (म्हणजेच केवळ १२०) उमेदवारांना शारीरीक क्षमता चाचणी परिक्षेकरिता बोलाविण्यात येईल. १:१५ गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने (म्हणजेच १२०व्या उमेदवाराने) मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना शारीरीक क्षमता चाचणीकरीता बोलाविण्यात येईल. |
| २०) | शारीरीक क्षमता चाचणी मध्ये किमान गुण मिळविलेल्या उमेदवारांची संख्या २४ पेक्षा अधिक झाल्यास, गुणवत्तेच्या आधारे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या पदाच्या ३ पट (म्हणजेच केवळ २४) उमेदवारांना वैयक्तीक मुलाखतीकरीता बोलाविण्यात येईल. १:३ गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने (म्हणजेच २४व्या उमेदवाराने) मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना वैयक्तीक मुलाखतीकरीता बोलाविण्यात येईल. |
| २१) | प्रतिक्षा यादी ही केवळ निवड यादीतून उमेदवार पदावर रूजू होण्यासाठी दिलेल्या विहित मुदतीत रूजू न झाल्यामुळे रिक्त झालेल्या किंवा निवड यादीतील उमेदवार पदावर रूजू झाल्यास परंतु उमेदवाराने निवड यादीच्या वैधता कालावधीत राजीनामा दिल्यास अगर अन्य कोणत्याही कारणांमुळे निवड यादीतील निवड झालेल्या उमेदवाराचे पद रिक्त झाल्यास वापरात येईल. |

| | |
|---|---|
| २२) | या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल. |

आदेशावरून
स्वाक्षरीत/—
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
बीड.

दिनांक : २७/०७/२०२६

# परिशिष्ट 'अ'

## जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

प्रति,

माननीय प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
बीड.

विषय :— '' सफाईगार पदासाठी अर्ज''.

माननीय महोदय,

विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो/करते की, मी 'सफाईगार ' या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास इच्छुक असून माझी तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे. (आवश्यक त्या ठिकाणी ✓ करावे.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव | आडनाव | नाव | वडील/पतीचे नाव |
| | | | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) | | | |
| ३ | राष्ट्रीयत्व **(Nationality)** | | | |
| ४ | उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? | होय/नाही | | |
| ५ | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक | | | |
| ६ | ई—मेल **ID** | | | |
| ७ | लिंग | | | |
| ८ | धर्म | | | |
| ९ | जात | | | |
| १० | प्रवर्ग | | | |
| ११ | जन्म दिनांक **(DD-MM-YYYY)** | | | |
| १२ | जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय | ....... वर्षे ......... महिने ............ दिवस | | |

| | | |
|---|---|---|
| १३ | उमेदवाराची वैवाहीक स्थिती (अविवाहीत/ विवाहीत/ घटस्फोटित/ विधवा/विधुर) | |
| १४ | हयात असलेल्या मुलांची संख्या | |
| १५. | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा) | |
| १६ | उमेदवार दिव्यांग आहे काय? | होय/ नाही |

१७. शैक्षणिक अर्हता : **(उच्चतम शैक्षणिक अर्हता नमूद करणे बंधनकारक आहे)**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१८. सफाई कामाचा अनुभव : आहे किंवा नाही, असल्यास खालील तपशिल भरावा.

| अ.क्र. | अनुभव (संबंधीत कार्यालयाचे नांव व पत्ता) | कालावधी | | एकुण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १९ | इतर विशेष/अतिरिक्त अर्हता | |
| २० | ज्ञात भाषा | |
| | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास : | |
| | अ. कार्यालयाचे नाव | |
| २१ | ब. धारण केलेले पद | |
| | क. नियुक्ती दिनांक | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ड. अर्ज करताना सदर कार्यालयाव्दारे ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय? | होय | नाही | लागू नाही |
| २२ | सफाईगार पदासाठी अर्ज करण्याकरीता आवश्यक असलेल्या शुल्काची पोस्टल ऑर्डर (Postal Order) / डिमांड ड्राफ्ट (Demand Draft)ची माहिती (मुळ प्रत अर्जासोबत जोडावी) | पोस्टल ऑर्डर :— डिमांड ड्राफ्ट :—<br>क्रमांक :—<br>दिनांक :—<br>शुल्क रूपये :— | | |
| २३ | उमेदवारा विरूध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का? (असल्यास माहिती नमूद करावी) | होय / नाही | | |
| २४ | उमेदवारास न्यायालयाने दोषी ठरवले आहे का ? (असल्यास माहिती नमूद करावी) | होय / नाही | | |
| २५ | उमेदवारा विरूध्द (शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास)शिस्तभंगाची चौकशी सुरू आहे का ? (असल्यास माहिती नमूद करावी) | होय | नाही | लागू नाही |
| २६ | उमेदवारास विभागीय चौकशीत दोषी ठरवले आहे का ? | होय | नाही | लागू नाही |
| २७ | कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा प्रक्रियेत उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी किंवा काही कालावधीसाठी बाद केले आहे काय ? | होय / नाही | | |

मी, प्रतिज्ञापूर्वक जाहीर <u>करतो / करते</u> की, वरील नमूद केलेली माहिती अचूक व खरी दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरूध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

**दिनांक :**

**ठिकाण :** **उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

मा.

## परिशिष्ट 'ब'

### चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ____________________

राहणार __________ तालुका __________ जिल्हा __________ येथील

रहिवासी असून, मी त्यांना मागील __________ वर्षापासून ओळखतो/ओळखते,

त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते माझे नातेवाईक नाहीत.

करिता सदरील चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :

दिनांक :

प्रमाणपत्र देणा—याची सही, नाव व हुद्दा
सही :

नांव :

हुद्दा :

शिक्का/रबरी शिक्का
(Seal/Rubber Stamp)

पत्ता : ..........................................
..........................................
..........................................

भ्रमणध्वनी क्रमांक
......................

(चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्रे भरून वैयक्तीक मुलाखतीच्या वेळी सादर करावे.)

परिशिष्ट 'क'

प्रतिज्ञापन
नमुना ''अ''

(नियम ४ पहा)

मी, श्री/ श्रीमती/ कु.______________________

श्री/श्रीमती______________________ यांचा

मुलगा/मुलगी/पती/पत्नी, वय ________वर्ष राहणार

______________________ यांव्दारे पुढील प्रमाणे जाहीर

करतो/करते की,

१ मी सफाईगार या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२ आज रोजी मला ——— (संख्या) इतकी हयात मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ——— (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३ हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला असलेल्या मुलांमुळे हया पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी व नाव